**आरबीआय २००४-०५/४५८**
**डीसीएम (पीएलजी) क्र. जी ४०/१०.०१.००/२०००५**

**मे ०७, २००५**

अध्यक्ष/ व्यवस्थापकीय संचालक /अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक /मुख्य कार्यकारी अधिकारी.
सार्वजनिक क्षेत्रातील बँका, विदेशी बँका

प्रिय महोदय/महोदया

**अतिरिक्त / सुधारित सुरक्षा लक्षणांनी युक्त भारतीय बँक नोटा**

विशेषतः रु.१०० व रु.५०० च्या उच्च दर्जाच्या नकली नोटांचा वाढता प्रसार लक्षात घेऊन, आपल्या बँक नोटांमधील सुरक्षा लक्षणे अधिक सुरक्षापूर्ण करण्यासाठी, भारत सरकारने एक उच्चस्तरीय समिती तयार केली होती. या समितीच्या शिफ़ारशींचे परिक्षण केले गेले आणि शासनाच्या अनुमतीने, रिझर्व बँकेने निरनिराळ्या मूल्यांच्या बँकनोटांमध्ये काही अतिरिक्त सुरक्षा लक्षणे अंतर्भूत करुन प्रचलीत नोटांमध्ये सुधारणा करण्याचे ठरवले आहे. या नवीन / सुधारित /अतिरिक्त सुरक्षालक्षणांमुळे, त्यांची नक्कल करण्यास तर आळा बसेलच, आणि याशिवाय, नोटांची उघड लक्षणात वाढ होऊन, अस्सल नोटा ओळखण्यास जनतेला मदत होईल.

२. अशा अतिरिक्त/ सुधारित सुरक्षालक्षणे असलेल्या चलनी नोटांचे वितरण नजिकच्या भविष्यात करण्याचे ठरविले गेले आहे. रु. ५० मूल्याच्या व त्यावरील मूल्याच्या बँक नोटा टप्प्या-टप्प्याने २००५ मध्ये वितरीत केल्या जातील. आपल्याला माहीतच असेल की चलन परिक्षण आणि प्रक्रियांची कार्यरीती आरबीआय मध्ये यंत्राच्या मदतीने केल्या जातात. बँकानाही सूचित करण्यात आले आहे की, त्यांनीही चलनी नोटा हाताळण्यासाठी योग्य व पुरेशी यंत्रे स्वतःजवळ ठेवावित. त्यामुळे केवळ न- देता येण्यासारख्या नोटा आरबीआय कडे पुढील विल्हेवाट लावण्यासाठी त्यांना पाठविता येतील. यासाठी हे अत्यंत निकडीचे ठरते, की बँकांना सध्याच्या सुरक्षा लक्षणात कोणकोणते बदल करणात येणार आहेत याची माहीती मिळून त्यानुसार त्यांना त्यांच्याजवळील यंत्रात योग्य बदल करता येतील. यासोबत रु.५०, रु.१००, रु.५०० व रु.१००० या मूल्यांच्या नवीन/ अतिरिक्त उघड सुरक्षालक्षणांची माहिती दिली आहे. बँकांना कळविण्यात येते की त्यांनी सुरक्षा लक्ष्णांची ही यादी काळजीपूर्वक वाचून, तपासणी करुन बँक नोटा हाताळण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत.

३. बँक नोटांमध्ये अंतर्भूत करावयाच्या सुरक्षालक्षणांमधील बदलांची माहीती घेण्यास आणि सर्वसमावेशक तयारी करण्यासाठी एक बैठक घेण्यात येणार असून तिच्या दिनांकाबाबत आपणास वेगळी सूचना देण्यात येईल.या नोटांच्या वितरणाचे वेळी रिझर्व बँक या लक्षणांसाठी जनजागृती अभियान हाती घेईल.

आपला विश्वासू,

सही
(यु एस पालीवाल )
मुख्य महाव्यवस्थापक

**परिशिष्ट**

**रु.५०, रु.१००, रु.५०० व रु. १०००च्या बँक नोटांची सध्याची आणि सुधारित सुरक्षा लक्षणे.**

| **अनुक्रमांक** | **लक्षण** | **मूल्य** | **सध्याचे लक्षण /विशेषता** | **प्रायोजित विशेषता/लक्षण** |
|---|---|---|---|---|
| १ | कागद | सर्व | कापसाच्या चिंध्या व कापसाचा उपथर असलेल्या<br>व विशेष वॉटरमार्क असलेल्या कागदावर नोटेचे<br>छपाई केलेली असते. यामुळे नोटेस एक वेगळाच ''स्पर्श '' व कुरकुरीत आवाज येतो.<br>ग्रामेज<br>रु.१० ते रु. ५०० साठी ८२ जीएसएम<br>रु.१००० साठी ८७.५ जीएसएम.<br>जाडी (कॅलीपरने मोजण्यालायक )<br>रु.१० ते रु. ५०० साठी १०० मायक्रॉन्स<br>रु. १००० साठी १०५ मायक्रॉन्स | ग्रामेज<br>रु.१० ते रु. १०००<br>९० जीएसएम (-३)<br>जाडी<br>११० मायक्रॉन्स ( -५)<br>रु.१० ते रु.१०००<br>साठी |
| २ | वॉटरमार्क | सर्व | छायाप्रकाश परिणाम साधारण महात्मा गांधींचा वॉटरमार्क, खिडकीत बहुछटायुक्त रेषा. नोट प्रकाशाविरुध्द धरल्यास हे लक्षण दिसून येते. | सध्याचे सुरक्षा लक्षण राहील अबाधीत |
| ३ | गुप्त वॉटरमार्क | सर्व | 'आर बी आय' आणि मूल्यदर्शक अंक असलेला अतिरिक्त व गुप्त वॉटरमार्क | सध्याचे सुरक्षा लक्षण अबाधित राहील. |
| ४ | सुरक्षा धागा | रु १००० | रु १०० व रु ५०० च्या नोटांवर, दर्शनी | यंत्राने वाचता येणारा, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | रु ५०० रु १०० | बाजूस, वाचनीय व खिडक्या असलेला (हिंदीत) 'भारत' लिहलेला व आर बी आय लिहलेला सुरक्षा धागा दिसतो. रु १००० च्या नोटांवर मात्र या व्यतिरिक्त, १००० हा अंक,मागील बाजूस नोटातच समाविष्ट असलेल्या धाग्यावर दिसतो. नोट उजेडाविरुध्द धरल्यास हा धागा म्हणजे सरळ रेषाच दिसते.<br>अतिनील प्रकाशात, प्रतिदीप्तीमुळे रु ५०० व रु १०० च्या नोटेतील दर्शनी बाजूस निळा दिसतो रु १००० च्या नोटेत, अतिनील प्रकाशात दर्शनी बाजूस, प्रतिदीप्तीमुळे खिडक्यांच्या दृश्य भागावर इंद्रधनुष्याचे रंग दिसतात. रूंदी - रु १०० व रु ५०० साठी १.२ मिमी रु १००० साठी २ मिमी. | खिडक्या असलेला धातुहीन स्पष्ट मजकुर, (हिंदीत) 'भारत' व आर बी आय कोरलेला चुंबकीय सुरक्षा धागा, रु १०० व रु ५०० च्या नोटांवर असतो, रु १०० च्या नोटेवर हजार हा अंक बदलत्या रंगात निरनिराळ्या कोनातून पाहिल्यास धाग्याचा रंग हिरव्याचा निळा होतो . अतिनील प्रकाशात, मागच्या बाजूस प्रतिदीप्तीमुळे तो पिवळा दिसतो व दर्शनी बाजूवरील मजकुर प्रतिदीप्ती दाखवेल. रुंदी - रु १००० व रु ५०० च्या साठी ३ मिमी रु १०० साठी २ मिमी |
| | सुरक्षा धागा | रु ५० | वाचता येण्यासारखा, प्रतिदीप्त निळा निर्वात धातुसिंचन केलेला पूर्णपणे आत असलेला, भारत (हिंदीत) आणि आर बी आय लिहलेला सुरक्षा धागा रूंदी १.२ मिमी | यंत्राने वाचता येणारा, खिडक्या असलेला, धातुहीन स्पष्ट मजकुर असलेला, 'भारत' (हिंदीत) व आर बी आय कोरलेला व हे शब्द दोन्हीही बाजूंना अतिनील प्रकाशात पिवळ्या रंगात प्रतिदीप्त होतात. रुंदी - १.४ मिमी |
| ५ | इलेक्ट्रॉनिक वॉआटरमार्क | सर्व | अस्तित्वात नाही | महात्मा गांधींच्या वॉटरमार्कजवळ, मूल्याच्या अंकाचा ठळक वॉटरमार्क |
| ६ | ऑमरॉन नक्कल करण्यासे | रु ५० व त्यावरील | केवळ रु ५०० व रु १००० च्या नोटांवरच आहे.<br>ही विशेषता असलेल्या बँकनोटेची रंगीत | रु १०० आणि रु ५० मध्येही समाविष्ट केल्या जातील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अशक्य करणारी विशेषता | | फोटोकॉपियरवरने नक्कल केल्यास, नकलेच्या रंगात निरळीच छटा येते, ही विशेषता बी आय ए ने विकसित केली आणि रिझर्व बँक व बी आय एस मधील कारान्वये बँकनोटांमध्ये समाविष्ट करण्यात आली. | |
| ७ | छपाईचे वर्ष | सर्व | अस्तित्वात नाही | नोटेच्या मागील बाजूस छपाईचे वर्ष छापले जात असतांना समाविष्ट केले जाईल. |
| ८ | दृष्टीला बदलती वाटणारी शाई (ओ व्ही आय) | रु ५०० व रु १००० | नोटेच्या मध्यभागी मूल्याचा अंक छापण्यासाठी वापरण्यात येते. नोट सपाट धरल्यास हा अंक हिरवा दिसतो पण नोट तिरपी धरल्यास तो निळा दिसतो. आकड्यांचा आकार पुढील प्रमाणे<br>रु ५०० - १३ मिमी * ३० मिमी (३९० चौ मिमी)<br>रु १००० - १४.५ मिमी * ३९ मिमी (५६५.५ चौ मिमी) | अंकांचा आकार लहान. आणि सुधारित रंग - बदल नवीन हिरवा ते नवीन निळा<br>रु ५०० - १२ मिमी * २७.५ मिमी (३३० चौ मिमी )<br>रु १००० - १२ मिमी * ३४ मिमी (४०८ चौ मिमी ) |
| ९ | आरपार दृश्य परिणाम | सर्व | नोटेच्या समोरील (पोकळ ) आणि मागील (भरलेल्या) बाजूंवर छापलेले, वॉटरमार्कच्या जवळ असलेल्या, उभ्या पट्ट्याच्या मध्यभागी छापलेल्या लहान फुलांचे डिझाईन एवढ्या अचूकतेने पाठ- पोट छापले आहे की प्रकाशाविरुध्द नोट पाहत असतांना ते केवळ एकच डिझाईन वाटते. | अस्तित्वात असलेली सुरक्षा लक्षणे सुधारणा करुन पुढे चालु राहतील. |
| १० | सुप्त प्रतिमा | सर्व | महात्मा गांधींच्या चित्राच्या उजव्या बाजूस उभ्या पट्ट्यात नोटेच्या मूल्याच्या अंकाची सुप्त प्रतिमा असून, नोट डोळ्यांच्या पातळीत क्षितिज समांतर धरल्यास दिसू शकते. | अस्तित्वात असलेली सुरक्षालक्षणे सुधारणा करुन पुढे चालु राहतील |
| ११ | अतिसूक्ष्म अक्षरे | सर्व | हे सूक्ष्म अक्षरांचे, उभा पट्टा आणि महात्मा गांधींचे चित्र यांच्यामध्ये आहे. त्यात रु १० च्या नोटेतील १० हा अंक दिसतो व रु २० च्या नोटेत वरील प्रमाणे अंक व आर बी आय ही अक्षरे दिसू शकतात. व ती बृहदर्शक भिंगातून पाहता येतात. | अस्तित्वात असलेली सुरक्षालक्षणे सुरुच राहतील |
| १२ | इंटाग्लिओ | सर्व | बँकेचे हिंदी व इंग्रजीमधील नाव, रिझर्व | प्लेट बनवितांना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | छपाई | | बँकेचे सील, हमी आणि वचनाचा मजकुर, डावीकडील अशोक स्तभांचे चिन्ह, आर बी आय च्या गव्हर्नरची सही यांची इंटाग्लिओ छपाई केली आहे. म्हणजे वर उचलेली व स्पर्शाने जाणवणारी. सध्या प्लेट बनवितांना इंटाग्लिओ ८० मायक्रॉन आहे. रु ५०० व रु १००० च्या नोटांवर मागील बाजुवरही इंटाग्लिओ छपाई केली गेली आहे | इंटाग्लिओ १३० मायक्रॉन करुन इंटाग्लिओ परिणाम नोटे केवळ दर्शनी बाजूस वाढविला जाईल.<br>रु ५०० व रु १००० च्या नोटांवरही दर्शनी बाजूवरच इंटाग्लिओ छपाई केली जाईल. |
| १३ | ओळखण्याचे चिन्ह | सर्व | रु ५० च्या नोटेत एक चौरस, रु १०० मध्ये एक त्रिकोण, रु ५०० मध्ये एक वर्तूळ, आणि रु १००० मध्ये एक चौकट( हिऱ्याचा आकार), वॉटरमार्क खिडकीच्या डाव्या बाजूस इंटाग्लिओ रीतीने छापला असून तो दृष्टीहीनांसाठी नोटेचे मूल्य ओळखण्यास उपयोगी पडतो. | एनग्रोन्हिंगची खोली ८३ मायक्रॉन ऎवजी १६० मायक्रॉन्स केली जाईल. |
| १४ | प्रतिदीप्ती | सर्व | अंक फलक आणि नोटेचा मधला भागात प्रतिदीप्त शाई वापरली आहे. बँकनोटांमध्ये ऑप्टिकल फायबर्स सुध्दा आहेत. हे दोन्हीही अतिनील प्रकाशात नोटा ठेवल्यास दिसू शकतात. | अस्तित्वात असलेली सुरक्षा लक्षणे पुढे सुरू राहतील. |
| १५ | ऑप्टीकल फायबर्स | सर्व | एकाच रंगाचे ऑप्टीकल फायबर्स | दुरंगी ऑप्टीकल फायबर्स |